*पोंभुर्णा येथील प्राथमिक आरोग्य केंद्र उमरी पोतदार येथे स्थलांतरीत करण्याचा निर्णय*

*अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी नागरिकांना दिलेला शब्द केला पूर्ण*
====================================================================

अर्थमंत्री तथा चंद्रपूर जिल्हयाचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या पुढाकाराने पोंभुर्णा येथील प्राथमिक आरोग्य केंद्र उमरी पोतदार येथे स्थलांतरीत करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. सार्वजनिक आरोग्य विभागाने दिनांक 7 डिसेंबर 2018 रोजी याबाबतचा शासन निर्णय निर्गमित केला आहे. अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी उमरी पोतदार येथील नागरिकांना दिलेला शब्द पूर्ण केला आहे.

अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या पुढाकाराने चंद्रपूर जिल्हयातील पोंभुर्णा या आदिवासी बहुल तालुक्याच्या ठिकाणी ग्रामीण रूग्णालय मंजूर करण्यात आले. पोंभुर्णा येथे ग्रामीण रूग्णालय मंजूर झाल्याने त्या ठिकाणचे प्राथमिक आरोग्य केंद्र नजिकच्या परिसरात उमरी पोतदार येथे स्थलांतरीत करण्याबाबत नागरिकांच्या मागणीच्या अनुषंगाने अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी सातत्याने पत्रव्यवहार व पाठपुरावा केला. त्यांच्या या प्रयत्नांना यश प्राप्त झाले असून याबाबतचा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे.

पोंभुर्णा येथील गामीण रूग्णालय कार्यान्वीत झाल्यानंतर सदर प्राथमिक आरोग्य केंद्र उमरी पोतदार येथे कार्यान्वीत होणार आहे. उमरी पोतदार येथे प्राथमिक आरोग्य केंद्र स्थलांतरीत करण्याच्या निर्णय घेण्यात आल्यामुळे या परिसरातील नागरिकांना मोठी आरोग्य विषयक सुविधा उपलब्ध होणार आहे. यापूर्वीही बल्लारपूर तालुक्यातील मानोरा येथे विशेष बाब या सदराखाली प्राथमिक आरोग्य केंद्र अर्थमंत्र्यांच्या पुढाकाराने मंजूर करण्यात आले आहे. सदर निर्णयामुळे उमरी पोतदार येथील तसेच लगतच्या परिसरातील गावांमधील नागरिकांत आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.